जनसपर्क क
30 OCT 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, को

झेक प्रजासत्ताकच्या संशोधन शिष्टमंडळाची भेट

- कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले स्वागत

जनप्रवास : कोल्हापूर

झेक प्रजासत्ताकच्या इंटरनॅशनल न्यूरोडिजेनेरेटिव्ह डिसऑर्डर रिसर्च सेंटरच्या (INDRC) प्रतिनिधींनी शिवाजी विद्यापीठाला भेट देऊन संशोधनातील आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संभाव्य संधींबाबत चर्चा केली.

संशोधनातील आंतरराष्ट्रीय सहकार्य, ज्ञानाची देवाणघेवाण आणि आंतरविद्याशाखीय समन्वयाच्या माध्यमातून संशोधनाच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठास काल झेक प्रजासत्ताक येथील इंटरनॅशनल न्यूरोडीजेनेरेटिव्ह डिसऑर्डर रिसर्च सेंटरचे संचालक विट डोकल आणि संस्थेचे एथिक्स अँड सिक्युरिटी मॅनेजर ललित पाटील यांनी भेट दिली. कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासमवेत त्यांनी संशोधन क्षेत्रातील परस्पर सहकार्य, संस्थात्मक समन्वय आणि भविष्यातील सहकार्याच्या संभाव्य दिशांवर विचारविनिमय केला.

डॉ. आसावरी जाधव यांनी स्वागत केले. संगणकशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक तथा राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे उपस्थित होते. डॉ. सोनल चोंदे यांनी आभार मानले.



झेक प्रजासत्ताकच्या रिसर्च सेंटरचे संचालक विट डोकल यांचे शिवाजी विद्यापीठात स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत. सोबत डॉ. आसावरी जाधव, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि ललित पाटील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज व्ह्यूज
30 OCT 2026



उद्योग-विद्यापीठ सहकार्यातून विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी : कुलगुरू डॉ. राजनीश कामत

शिवाजी विद्यापीठाचा ग्रीन सोल्युशन्स इंडस्ट्रीजसमवेत सामंजस्य करार

कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज):

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देणे, आजच्या शिक्षणप्रणालीत अभिप्रेत आहे. विद्यापीठातील शैक्षणिक व संशोधनविषयक क्षमता आणि उद्योगक्षेत्रातील व्यावहारिक अनुभव यांची सांगड घातल्यास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासह संशोधनालाही नवी दिशा मिळू शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.



शिवाजी विद्यापीठ आणि पुणे येथील ग्रीन सोल्युशन्स इंडस्ट्रीज प्रा. लि. यांच्यात काल झालेल्या सामंजस्य करारावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ते म्हणाले, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण, प्रात्यक्षिक अनुभव आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बदलत्या औद्योगिक गरजा आणि रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्राचा अनुभव मिळाल्यास त्यांची व्यावसायिक तयारी अधिक सक्षम होण्यास मदत होईल. तसेच, विद्यापीठ आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे ज्ञानाचे व्यावहारिक उपयोगात रूपांतर करण्याच्या संधीही वाढतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधनविषयक कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी विविध संस्था, उद्योग आणि संशोधन केंद्रांशी सहकार्य वाढविणे आवश्यक आहे. अशा सहकार्यातून ज्ञानाची देवाणघेवाण, संशोधनाला व्यावहारिक दिशा आणि परस्पर सहकार्याच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

ग्रीन सोल्युशन्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवाळे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. उद्योगक्षेत्रातील अनुभव आणि विद्यापीठातील शैक्षणिक व संशोधनविषयक कौशल्य यांच्या परस्परपूरक वापरातून विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाच्या आणि ज्ञानविस्ताराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात, या दृष्टीने या सहकार्याला महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि श्री. अहिवाळे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी ग्रीन सोल्युशन्सच्या आरती भोसले आणि विद्युलता पाटील उपस्थित होत्या.

30 OCT 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सिंधुदुर्ग समाचार

उद्योग-विद्यापीठ सहकार्यातून विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी : कुलगुरू डॉ.राजनीश कामत

कोल्हापूर/प्रतिनिधी :

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देणे, आजच्या शिक्षणप्रणालीत अभिप्रेत आहे. विद्यापीठातील शैक्षणिक व संशोधनविषयक क्षमता आणि उद्योगक्षेत्रातील व्यावहारिक अनुभव यांची सांगड घातल्यास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासह संशोधनालाही नवी दिशा मिळू शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि पुणे येथील ग्रीन सोल्यूशन्स इंडस्ट्रीज प्रा. लि. यांच्यात काल झालेल्या सामंजस्य करारावेळी ते प्रमुखस्थानावरून बोलत होते. ते म्हणाले, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण, प्रात्यक्षिक अनुभव आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बदलत्या औद्योगिक गरजा आणि रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्राचा अनुभव मिळाल्यास त्यांची व्यावसायिक तयारी अधिक सक्षम होण्यास मदत होईल. तसेच, विद्यापीठ आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे ज्ञानाचे व्यावहारिक उपयोगात रूपांतर करण्याच्या संधीही वाढतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधनविषयक कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी विविध संस्था, उद्योग आणि संशोधन केंद्रांशी सहकार्य वाढविणे आवश्यक आहे. अशा सहकार्यातून ज्ञानाची देवाणघेवाण, संशोधनाला व्यावहारिक दिशा आणि परस्पर सहकार्याच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

ग्रीन सोल्यूशन्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवाळे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. उद्योगक्षेत्रातील अनुभव आणि विद्यापीठातील शैक्षणिक व संशोधनविषयक कौशल्य यांच्या परस्परपूरक वापरातून विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाच्या आणि ज्ञानविस्ताराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात, या दृष्टीने या सहकार्याला महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि श्री. अहिवाळे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव, ग्रीन सोल्यूशन्सच्या आरती भोसले आणि विद्युलता पाटील उपस्थित होत्या.

30 OCT 2026

तरुण भारत

न्या. महादेव रानडे स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान

प्रतिनिधी, कोल्हापूर

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व न्यायविषयक विचारविश्वाला आकार देणारे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या १२५ व्या स्मृतिवर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे 'महादेव गोविंद रानडे: काळ आणि कर्तृत्व' या विषयावर मंगळवार दि.३ व ४ नोव्हेंबर रोजी दोनदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

या व्याख्यानमालेतून रानडे यांच्या प्रबोधनपर विचारांचा, आर्थिक चिंतनाचा, सामाजिक सुधारणांच्या भूमिकेचा तसेच न्यायाधीश म्हणून केलेल्या कार्याचा विविध अंगांनी मागोवा घेण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या गणितशास्त्र अधिविभागातील रामानुजन सभागृहात ही व्याख्यानमाला होणार आहे. ३ नोव्हेंबरला सकाळी ११.३० वाजता चर्चासत्राचे उद्घाटन होईल. त्यानंतर किशोर बेडकिहाळ यांचे 'न्यायमूर्ती रानडे आणि महाराष्ट्रातील प्रबोधन" या विषयावर, तर डॉ. नीरज हातेकर यांचे 'न्यायमूर्ती रानडे यांच्या आर्थिक विचारांची समकालीन प्रस्तुतता" या विषयांवर व्याख्यान होईल. दुपारच्या सत्रात डॉ. भारती पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. देवकुमार अहिरे आणि डॉ. दत्तात्रय मचाले यांची व्याख्याने होतील.

४ नोव्हेंबर रोजी सकाळच्या सत्रात डॉ. नागोराव कुंभार, डॉ. प्रकाश पवार, डॉ. अवनीश पाटील आणि डॉ. नीलांबरी जगताप यांची व्याख्याने होतील. दुपारच्या सत्रात डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. कृष्णा पाटील, तर डॉ. सूर्यकांत गायकवाड विचार मांडतील. समारोप सत्रात डॉ. अशोक चौसाळकर यांचे 'न्यायमूर्ती रानडे यांचे धर्मविचार" या विषयावर व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 OCT 2026

महा न्यूज व्हूज



न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या विचारांचा समकालीन संदर्भ उलगडणार

शिवाजी विद्यापीठात ३ नोव्हेंबरपासून दोनदिवसीय व्याख्यानमाला

कोल्हापूर (महा न्यूज ॲण्ड व्हूज) :

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि न्यायविषयक विचारविश्वाला आकार देणारे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या १२५ व्या स्मृतिवर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे 'महादेव गोविंद रानडे: काळ आणि कर्तृत्व' या विषयावर ३ व ४ नोव्हेंबर रोजी दोनदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेतून रानडे यांच्या प्रबोधनपर विचारांचा, आर्थिक चिंतनाचा, सामाजिक सुधारणांच्या भूमिकेचा तसेच न्यायाधीश म्हणून केलेल्या कार्याचा विविध अंगांनी मागोवा घेण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या गणितशास्त्र अधिविभागातील रामानुजन सभागृहात ही व्याख्यानमाला होणार आहे. ३ नोव्हेंबरला सकाळी ११.३० वाजता चर्चासत्राचे उद्घाटन होईल. त्यानंतर किशोर बेडकिहाळ यांचे 'न्यायमूर्ती रानडे आणि महाराष्ट्रातील प्रबोधन' या विषयावर, तर डॉ. नीरज हातेकर यांचे 'न्यायमूर्ती रानडे यांच्या आर्थिक विचारांची समकालीन प्रस्तुतता' या विषयांवर व्याख्यान होईल.

दुपारच्या सत्रात डॉ. भारती पाटील ('न्यायमूर्ती रानडे आणि गोपाळ कृष्ण गोखले'), डॉ. रणधीर



शिंदे ('न्यायमूर्ती रानडे आणि महर्षी शिंदे: अनुबंध'), डॉ. देवकुमार अहिरे ('न्यायमूर्ती रानडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर') आणि डॉ. दत्तात्रय मचाले ('न्यायमूर्ती रानडे आणि पुणे सार्वजनिक सभा') यांची व्याख्याने होतील.

दुसऱ्या दिवशी, ४ नोव्हेंबर रोजी सकाळच्या सत्रात डॉ. नागोराव कुंभार ('न्यायमूर्ती रानडे यांचे शैक्षणिक विचार'), डॉ. प्रकाश पवार ('न्यायमूर्ती रानडे यांचे राजकीय विचार'), डॉ. अवनीश पाटील ('न्यायमूर्ती रानडे यांची इतिहास मीमांसा') आणि डॉ. नीलांबरी जगताप ('न्यायाधीश म्हणून रानडे यांचे न्यायालयीन कार्य') यांची व्याख्याने होतील.

दुपारच्या सत्रात डॉ. नंदकुमार मोरे ('न्यायमूर्ती रानडे आणि भाषाविषयक विचार'), डॉ. कृष्णा पाटील (न्यायमूर्ती रानडे यांच्या 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथाची ऐतिहासिक चिकित्सा), तर डॉ. सूर्यकांत गायकवाड ('न्यायमूर्ती रानडे: भाषा आणि शिक्षण') विचार मांडतील. समारोप सत्रात डॉ. अशोक चौसाळकर हे 'न्यायमूर्ती रानडे यांचे धर्मविचार' या विषयावर व्याख्यान देतील.

न्यायमूर्ती रानडे यांनी सामाजिक सुधारणांसह आर्थिक विकास, शिक्षण, राजकीय प्रबोधन आणि इतिहासलेखन अशा विविध क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या विचारांचा आजच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीशी असलेला संबंध समजून घेण्याची संधी या व्याख्यानमालेतून मिळणार आहे. जिज्ञासूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहात या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 OCT 2026 सिंधुदुर्ग समाचार

न्या.महादेव गोविंद रानडे यांच्या विचारांचा समकालीन संदर्भ उलगडणार



शिवाजी विद्यापीठात ३ नोव्हेंबरपासून दोनदिवसीय व्याख्यानमाला

कोल्हापूर/प्रतिनिधी :

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि न्यायविषयक विचारविश्वाला आकार देणारे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या १२५ व्या स्मृतिवर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे 'महादेव गोविंद रानडेः काळ आणि कर्तृत्व' या विषयावर ३ व ४ नोव्हेंबर रोजी दोनदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेतून रानडे यांच्या प्रबोधनपर विचारांचा, आर्थिक चिंतनाचा, सामाजिक सुधारणांच्या भूमिकेचा तसेच न्यायाधीश म्हणून केलेल्या कार्याचा विविध अंगांनी मागोवा घेण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या गणितशास्त्र अधिविभागातील रामानुजन सभागृहात ही व्याख्यानमाला होणार आहे. ३ नोव्हेंबरला सकाळी ११.३० वाजता चर्चासत्राचे उद्घाटन होईल. त्यानंतर किशोर बेडकिहाळ यांचे 'न्यायमूर्ती रानडे आणि महाराष्ट्रातील प्रबोधन' या विषयावर, तर डॉ. नीरज हातेकर यांचे 'न्यायमूर्ती रानडे यांच्या आर्थिक विचारांची समकालीन प्रस्तुतता' या विषयांवर व्याख्यान होईल.

दुपारच्या सत्रात डॉ. भारती पाटील ('न्यायमूर्ती रानडे आणि गोपाळ कृष्ण गोखले'), डॉ. रणधीर शिंदे ('न्यायमूर्ती रानडे आणि महर्षी शिंदेः अनुबंध'), डॉ. देवकुमार अहिरे ('न्यायमूर्ती रानडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर') आणि डॉ. दत्तात्रय मचाले ('न्यायमूर्ती रानडे आणि पुणे सार्वजनिक सभा') यांची व्याख्याने होतील.

दुसऱ्या दिवशी, ४ नोव्हेंबर रोजी सकाळच्या सत्रात डॉ. नागोराव कुंभार ('न्यायमूर्ती रानडे यांचे शैक्षणिक विचार'), डॉ. प्रकाश पवार ('न्यायमूर्ती रानडे यांचे राजकीय विचार'), डॉ. अवनीश पाटील ('न्यायमूर्ती रानडे यांची इतिहास मीमांसा') आणि डॉ. नीलांबरी जगताप ('न्यायाधीश म्हणून रानडे यांचे न्यायालयीन कार्य') यांची व्याख्याने होतील.

दुपारच्या सत्रात डॉ. नंदकुमार मोरे ('न्यायमूर्ती रानडे आणि भाषाविषयक विचार'), डॉ. कृष्णा पाटील (न्यायमूर्ती रानडे यांच्या 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथाची ऐतिहासिक चिकित्सा), तर डॉ. सूर्यकांत गायकवाड ('न्यायमूर्ती रानडेः भाषा आणि शिक्षण') विचार मांडतील. समारोप सत्रात डॉ. अशोक चौसाळकर हे 'न्यायमूर्ती रानडे यांचे धर्मविचार' या विषयावर व्याख्यान देतील.

न्यायमूर्ती रानडे यांनी सामाजिक सुधारणांसह आर्थिक विकास, शिक्षण, राजकीय प्रबोधन आणि इतिहासलेखन अशा विविध क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या विचारांचा आजच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीशी असलेला संबंध समजून घेण्याची संधी या व्याख्यानमालेतून मिळणार आहे. जिज्ञासूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहात या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 OCT 2026

लोकमत

वीस महाविद्यालये; 'पुरुषोत्तम करंडक'चा जल्लोष आजपासून

तीन दिवस रंगणार एकांकिकांचा महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाविद्यालयीन नाट्यविश्वातील प्रतिष्ठेची 'पुरुषोत्तम करंडक' आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेची कोल्हापूर विभागीय फेरी आजपासून (दि. ३०) ते १ नोव्हेंबर दरम्यान टेंबे रंगमंदिर, देवल क्लब येथे रंगणार आहे. या तीन दिवसीय स्पर्धेत विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी अभिनय, लेखन आणि दिग्दर्शन कौशल्य सादर करणार आहेत.

महाराष्ट्रीय कलोपासक, पुणे; गायन समाज देवल क्लब, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेमुळे महाविद्यालयीन कलाकारांना आपली नाट्यप्रतिभा सादर करण्याची संधी मिळणार असून, कोल्हापुरातील नाट्यरसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

१. शुक्रवारी (दि. ३०) : 'नकाब', 'शाब्बास पठ्ठे!', 'छप्पर', 'ओऑसिस', 'द अनसीन ह्विजन', 'वाघ आला वाघ', 'मागचं दार', 'साठी' आणि 'आभास'
२. शनिवारी (दि. ३१) : 'महाकुंभ', 'साडेतीन हातांचा हिशोब', 'विवर', 'पालखी', 'म्याडम', 'मोठा पाऊस आला', 'रोमच्या सुताराची गोष्ट', 'चौदा इंचाचा वनवास'
३. रविवारी (दि. १ नोव्हेंबर) : 'सहेला', 'बीफोर द ट्रीगर' आणि 'पेरा' या एकांकिका प्रेक्षकांना पाहता येतील.

30 OCT 2026

सकाळ



कोल्हापूर : पश्चिम विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत सर्वसाधारण उपविजेतेपद पटकाविणारा शिवाजी विद्यापीठाचा वेटलिफ्टिंगचा संघ.

पश्चिम विभागीय वेटलिफ्टिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाला उपविजेतेपद

कोल्हापूर, ता. २९ : गुजरातमधील सकलचंद पटेल विद्यापीठात सुरू असलेल्या पश्चिम विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने सर्वसाधारण उपविजेतेपद पटकाविले. खेळाडूंनी तीन सुवर्ण, एक रौप्यपदक मिळविले. विद्यापीठाच्या सहा खेळाडूंची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अस्मिता ढोणे (५३ किलो), श्रावणी जाधव (५७ किलो), ईश्वरी पोवार (८६ किलो) यांनी सुवर्ण, तर राजनंदिनी आमने (७७ किलो) हिने रौप्यपदक पटकाविले. श्रद्धा होनमोरे (६९ किलो) हिने पाचवा, साक्षी सांदुगडे (५३ किलो) सहावा, वेदिका टोले (४९ किलो) नववा, तर प्राची देबाजे हिने (८६ किलो) बारावा क्रमांक मिळवला. सहा खेळाडूंची ४ ते ९ डिसेंबर दरम्यान ओडिशातील कलिंगा विद्यापीठात होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक प्रा. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन, तर प्रा. डॉ. रवींद्र चव्हाण, प्रशिक्षक डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 OCT 2026 लोकमत

विद्यापीठाला वेटलिफ्टिंगमध्ये सर्वसाधारण उपविजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठ संघाने सकलचंद पटेल विद्यापीठ, गुजरात येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिलांच्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत सर्वसाधारण उपविजेतेपद पटकाविले. या स्पर्धेत विद्यापीठाने ३ सुवर्ण व १ रौप्यपदक पटकावले.

स्पर्धेत ५३ किलो गटात अस्मिता ढोणे, ५७ किलो गटात श्रावणी जाधव तर ८६ किलो गटात ईश्वरी पवार हिने सुवर्ण पटकाविले. ७७ किलो गटात राजनंदिनी आमने हिने रौप्यपदक पटकाविले. ६९ किलो गटात श्रद्धा होनमोरे (पाचवा) ५३ किलो गटात साक्षी सांदुगडे (सहावा), ४९ किलो गटात वेदिका टोले (नववा), ८६ किलो गटात प्राची देबाजे हिने बारावा क्रमांक मिळविला.यातील सहा खेळाडूंची कलिंगा युनिव्हर्सिटी, ओडिसा येथे ४ ते ९ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली. यशस्वी खेळाडूंना कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. सौ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. तर देवचंद कॉलेजचे प्रा. डॉ. रवींद्र चव्हाण व प्रशिक्षक प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिलांच्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत सर्वसाधारण उपविजेतेपद पटकाविणाऱ्या शिवाजी विद्यापीठ संघाला चषक प्रदान केला. यावेळी संघातील पदकविजेते खेळाडू व मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
30 OCT 2026 जनप्रवास
शिवाजी विद्यापीठ



पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला उपविजेतेपद

- शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून अभिनंदन

जनप्रवास : कोल्हापूर

गुजरातमधील सकलचंद पटेल विद्यापीठ येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी तीन सुवर्ण आणि एका रौप्य पदकाची कमाई करीत सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावले.

स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या अस्मिता ढोणे (५३ किलो), श्रावणी जाधव (५७ किलो) आणि ईश्वरी पोवार (८६ किलो) यांनी सुवर्णपदके मिळविली. राजनंदिनी आमणे हिने ७७ किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावले. श्रद्धा होनमोरे (६९ किलो) हिने पाचवा, साक्षी सांदुगडे (५३ किलो) हिने सहावा, वेदिका टोले (४९ किलो) हिने नववा, तर प्राची देबाजे (८६ किलोवरील गट) हिने बारावा क्रमांक मिळविला. या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे विद्यापीठाच्या सहा खेळाडूंची निवड येत्या ४ ते ९ डिसेंबर या कालावधीत ओडिशातील कलिंगा विद्यापीठ येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी झाली आहे. या यशस्वी खेळाडूंना कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू ज्योती जाधव, कुलसचिव विलास शिंदे आणि डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. डॉ. रवींद्र चव्हाण यांनी संघ व्यवस्थापक म्हणून तर शहाजी महाविद्यालयाचे डॉ. प्रशांत पाटील यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सिंधुदुर्ग समाचार

30 OCT 2026

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला उपविजेतेपद

कोल्हापूर/प्रतिनिधी :

गुजरातमधील सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठ येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी तीन सुवर्ण आणि एका रौप्य पदकाची कमाई करीत सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावले.

या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या अस्मिता दोणे (५३ किलो), श्रावणी जाधव (५७ किलो) आणि ईश्वरी पोवार (८१ किलो) यांनी सुवर्णपदके मिळविली. राजनंदिनी आमने हिने ७७ किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावले. श्रद्धा सोनमोरे (६९ किलो) हिने चौथा, साक्षी सांदुगडे (५३ किलो) हिने सहावा, वेदिका टोले (४९ किलो) हिने नववा, तर प्राची देवाजे (८१ किलोवरील गट) हिने चौथा क्रमांक मिळविला.

या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे विद्यापीठाच्या सहा खेळाडूंची निवड येत्या ४ ते ९ डिसेंबर २०२६ या कालावधीत ओडिशातील कलिंगा विद्यापीठ येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी झाली आहे.

या यशस्वी खेळाडूंना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. देवचंद महाविद्यालयाचे डॉ. रवींद्र पाटील तर श्री शहाजी छत्रपती चव्हाण यांनी संघ व्यवस्थापक महाविद्यालयाचे डॉ. प्रशांत काम पाहिले.



महावितरण
ई-निविदा